चांगल्या विचाराला वाहिलेली एक चळवळ

# विचार प्रसार

वर्ष तिसरे ऑगस्ट २००७ मूल्य रु. ३/-

संपादक - नारायण डोंगरे

## स्वातंत्र्याचा हीरक महोत्सव

**१५ ऑगस्टला** आपण आपल्या देशाचा साठावा स्वातंत्र्यदिन साजरा करणार आहोत. ह्या ६० वर्षांत भारताने जगात निश्चितच आपला ठसा उमटवला आहे. अणुचाचणी, संगणक क्रांती, हरित क्रांती, श्वेत क्रांती, संगणक क्षेत्रातील क्रांती, अवकाश-तंत्रज्ञान अशा कितीतरी क्षेत्रात आपण उत्तुंग भरारी मारली आहे. देश जागतिक पातळीवर प्रगतीपथावर घोडदौड करीत आहे. परंतु अंतर्गत व्यवस्थेत मात्र अद्यापही काही दोष आहेत. जातीयवाद, अक्षम पोलीस यंत्रणा, न्यायदानातील विलंब, गुन्हेगारी जगतातील दहशतवाद, भ्रष्टाचार अशांमुळे देशवासीयांत असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. ही भावना घातक आणि अन्यायकारक आहे.

आपल्या राज्याला आज देशात सुगीचे दिवस आले आहेत. महाराष्ट्रातील १० लोकप्रतिनिधी देशात विविध खात्यांचे मंत्री म्हणून वावरत आहेत. ते कमी की काय म्हणून देशाच्या राष्ट्रपतीपदी महाराष्ट्रीय व्यक्तीचीच निवड झाली आहे. राज्यात सुगीचे दिवस आले आहेत, असे म्हणायचे कारण म्हणजे देश औद्योगिकदृष्ट्या प्रगतीपथावर असला तरी राजकीयदृष्ट्या अधोगतीकडे जात आहे. देशाच्या कोणत्याच पक्षाकडे १५०वर खासदार नाहीत. पुढच्या निवडणुकीत प्रत्येक पक्षाचा हा आकडा अजून घसरेल. कदाचित भविष्यात एकदाच एका पक्षाचे बहुमताने खासदार निवडणून येतील. महाराष्ट्राला आज राष्ट्रपतीपद मिळाले. पण आपला देश जर उद्या राजकीयदृष्ट्या यापेक्षा अधिक भयाण स्थितीत गेला तर केवळ महाराष्ट्राचाच नेता देशाचा पंतप्रधान असू शकेल. सुगीच्या दिवसात अशा महत्त्वाच्या पदांवर बिगर महाराष्ट्रीयनच दिसतात.

चर्चिलची भविष्यवाणी म्हणत होती की हिंदुस्थानावर इंग्रजांनी १५० वर्षे

Scanned with CamScanner

राज्य केले, पण देश स्वतंत्र झाल्यावर त्यांना १५० वर्षेही स्वातंत्र्य टिकवता येणार नाही. पूर्वीच्या हिंदूस्तानचे गेल्या ६० वर्षात भारत, पाकिस्तान व बांगलादेश असे तीन शकले उडाली आहे. पुढच्या ९० वर्षात अजून किती तुकडे उडतील ते देवच जाणो. सध्याच पंजाब, जम्मू-काश्मिर, बोडो स्वतंत्र अस्तित्वासाठी झगडत आहेत, आंदोलन करीत आहेत. देशातून फुटून बाहेर पडण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहेत. महाराष्ट्रातही विभाजनाची भाषा अधूनमधूंन ऐकायला येते. त्यासाठी काही नेतेमंडळी प्रयत्नही करीत आहेत. आज राज्यांतून राज्ये आणि देशांतून नवीन देशाचे अस्तित्व निर्माण करण्याचे हे दुष्टकृत्ये होत आहेत.

भारतातील न्यायप्रक्रियेतील विलंब आणि परकियांची विशेषत: बांगलादेशीयांची घुसखोरी या दोन दोषांमुळे लोकांत असुरक्षिततेची भावना बळावली आहे.

प्रथम आपण न्यायदान प्रक्रियेविषयी पाहू. आज देशात प्रलंबित खटल्यांची संख्या एक कोटीच्यावर आहे. वयाच्या मध्यमवयात केलेल्या केसची सुनावणी कमीतकमी १०-१२ वर्षे होतच नाही. तारखांवर तारखा पडत असतात. त्यातच व्यक्तीचा वेळ, पैसा आणि कधीकधी हयात जाते. ज्यावेळी न्यायदानाची ही मुदत किमान एका वर्षावर येईल त्याचवेळी लोकांना न्याय मिळेल. कित्येक देशांत सुनावणी आणि अंमलबजावणी महिन्याभरातच होते. मात्र भारतात गुन्हेगार जीवनातील काही वर्षे तुरुंगात तर बरीचशी वर्षे तुरुंगाबाहेर आरामात काढतात. 'न्याय. उशीरा मिळणे म्हणजे अन्यायच असतो' असे जे म्हटले जाते ते याचसाठी. म्हणून प्रचलित न्यायप्रक्रियेत ज्यावेळी बदल होईल त्याचवेळी आपल्या देशातील लोक सुरक्षित आणि सुखी होतील.

दुसरा दोष म्हणजे अंतर्गत घुसखोरीचा. आज या देशात दोन कोटीपेक्षा अधिक घुसखोर आहेत. महाराष्ट्रातही या घुसखोरांची संख्या लाखाच्या घरात आहे. मुंबईत सातत्याने वाढणाऱ्या लोंढ्यामुळे महानगराचा विकासच होऊ शकत नाही. आज जे या शहराचे चित्र आहे तेच उद्या संपूर्ण देशाचे होऊ शकते. सतत होणाऱ्या घुसखोरीमुळे एक दिवस भारताच्या विकासाचा फायदा भारतीयांसाठी होणार नाही, तर परकीयांसाठी असेल. विकास व्हायचे थांबेल हे तर सोडाच पण त्यामुळे देशात अराजकता माजेल, यादवी सुरू होईल, त्याचे परिणाम किती भयंकर असतील याचा केवळ विचार केलेलाच बरा. आज आपण परकियांच्या लोंढ्यांना थोपवू शकत नाही तसेच उद्या ह्या घुसखोरांबद्दल होणार आहे. त्यांना रोखताही येणार नाही आणि हाकलताही येणार नाही.

घुसखोरीची समस्या किती घातक आहे हे ज्या देशातील राजकारण्यांना समजत नाही, ते राजकारणी देशाचे तुकडे पाडण्याचेच काम करत असतात. जी गत सोव्हिएत रशियाची झाली आणि त्या देशाचे १६ तुकडे झाले व त्यातील ६ राज्ये ही मुस्लिम राज्ये म्हणून उदयास आली, तसे आपल्या देशाचेही तुकडे होऊन नव्याने मुस्लिम राज्ये उदयास यायला वेळ लागणार नाही.

थोडक्यात, राज्यकर्त्यांनी झेंडा फडकवण्याचेच काम करू नये, तर देशातील प्रत्येक नागरिक - मग तो कोणत्याही जातीधर्माचा असो - भविष्यात कसा सुखासमाधानाने आणि सुरक्षित राहू शकेल याचा विचार करायला हवा. हा विचार राज्यकर्त्यांनीच नव्हे तर लोकशाहीच्या चार खांबांपैकी प्रत्येकाने केला पाहिजे.

आपला देश उत्तरोत्तर अखंडता जोपासत, प्रगती करत नागरिकांना सुख, वैभव, शांती यांची हमी देत राहो, हीच या निमित्ताने अपेक्षा.

**- नारायण डोंगरे**



Scanned with CamScanner

संस्कार कथा

# मोबदला

फार फार वर्षापूर्वीची गोष्ट आहे ही. सुवर्णपूर राज्यात कुमारवर्मा नावाचा एक राजा राज्य करीत होता. कुमारवर्मा होता तसा प्रजाहितदक्ष. आपल्या प्रजेविषयी त्याला कळवळा होता. आपल्या राज्यात त्याने अनेक सुधारणा घडवून आणल्या होत्या. पाणपोई, धर्मशाळा, मंदिरे, विद्यासंकुले उभारली होती. एखाद्या पालकाप्रमाणे तो आपल्या प्रजेचे पालन करीत होता. तरीही आपल्या प्रजेविषयी तो नाराज होता. कारण त्याची होती प्रजा फार आळशी. राजा हा आपला पालनकर्ता आहे, त्यामुळे राज्यातील सर्व कामे राजानेच करावीत अशी तिची अपेक्षा. आपली स्वत:ची कामेसुद्धा सरकारनेच करावीत असे त्यांना वाटे. शिवाय, सरकारने आपल्यासाठी सर्वकाही तयार करून द्यावे अशीही त्यांची अवास्तव मागणी होती. आपल्या प्रजेच्या ह्या कामचुकार सवयीवर काय उपाय करावेत हे राजाला सुचेना. त्याने लोकांना समजावयाचा हरप्रकारे प्रयत्न केला. नाना उपाय योजले. परंतु लोकांच्या मनावर त्याचा काहीएक परिणाम झाला नाही. शेवटी त्याने प्रजेला वेगळ्या प्रकारे एक धडा शिकवायचे ठरवले.

एके रात्री शहरातील भरचौकात एक भली मोठी धोंड नेऊन ठेवण्याची त्याने आपल्या सैनिकांना आज्ञा केली. सैनिकांनी आज्ञेचे तंतोतंत पालन केले. दुसऱ्या दिवशी सकाळी व्यापारी मंडळी व नगरजन आपल्या सामानसुमानासहीत बाजारातील त्या रस्त्याने जाऊ लागली. पण रस्त्यात अचानक आडव्या आलेल्या त्या अडथळ्यामुळे त्यांना चालताना त्रास होऊ लागला. प्रत्येक जण त्या धोंडीचा अडथळा पार करून पुढे जाऊ लागला. अशाच एका व्यापाऱ्याबरोबर दुसऱ्या राज्यात राहणारा त्याचा एक मित्र त्या रस्त्याने घोडागाडीतून चालला होता. चौकातील त्या धोंडीजवळ त्यांची गाडी येताच त्यांना गर्दीतून वाट काढावी लागत होती. अगोदरच माणसांची गर्दी त्यात परत घोडागाड्या, बैलगाड्या, घोडेस्वार यांची वर्दळ. त्यामुळे वाहतुकीची कोंडी होऊ लागली. रस्त्यात त्या परदेशी मित्राने व्यापाऱ्याला सांगितले "मित्रा, तुझ्या गाडीवानाला खाली उतरून तो दगड बाजूला करायला सांग. म्हणजे रस्त्यातील अडथळा दूर होईल." त्यावर त्या व्यापाराने उत्तर दिले, "आपण का बरं त्रास घ्यायचा. रस्त्यातला दगड हलवणं हे काही आपलं काम नाही. ते तर सरकारचं काम. सरकारी कामात आपण का व्यत्यय आणावा?"

थोड्या वेळाने घोडदळातील एक अधिकारी त्या रस्त्यावरून आला. दुर्दैवाने त्याचा पाय रस्त्यातल्या त्या दगडावर ठेचाळला. त्याने दोनचार शिव्या हासडल्या. सरकारला दोष दिला व तो पुढे चालता झाला.

अजून थोडा वेळ निघून गेला. एका तरुण युवकाचे त्या रस्त्यावरून येणे झाले. भर रस्त्यातला दगड पाहून तो मनाशी पुटपुटला, "हा दगड बाजूला करून ह्या वेळी माझे हात मळके करण्याची माझी इच्छा नाही. सिनेमा पाहून परत येताना दगड हलविण्याबाबत विचार करू." - आणि त्याने आपला रस्ता धरला.

मघाचा तरुण सिनेमा पाहून परत येण्यापूर्वी त्या रस्त्यावरून खेड्यातील एक गरीब शेतकरी भाजी विकण्यासाठी तेथून जात होता. त्याने तो रस्त्यातील दगड पाहिला. जाणाऱ्या-येणाऱ्यांना तो कसा अडथळा होऊन बसला आहे हेही त्याच्या तात्काळ लक्षात आले. त्याने आपल्या डोक्यावरील भाजीची पाटी बाजूला ठेवली व एकटाच दगड बाजूला सारू लागला. दगड केव्हढा नि शेतकऱ्याची



Scanned with CamScanner

ताकद ती केवढी. तरीही तो प्रयत्न करत होता. खरं तर ते एकट्यादुकट्याचं काम नव्हतं. तो भला मोठा दगड हलवणे त्या एकट्याला शक्य नव्हते म्हणून त्याने तेथून जाणाऱ्या आपल्या एका ओळखीच्या शिक्षकाला मदतीसाठी हाक मारली, "अहो मास्तर, पहा ना केवढी मोठी धोंड रस्त्यावर पडली आहे. आपण सरकवून ती रस्त्याच्या कडेला ठेवूया. मला एकट्याला हे जम नाही: जरा मदत करता का?" त्यावर तो शिक्षक उद्गारला, "मी डोक्याचे काम करतो, बाहुबलाचे नाही. तुला जमत नसेल तर कशाला विनाकारण तडमडतोयस. हे काम सरकारचं आहे. आपलं नाही. जा, तू भाजी विकायला जा. दोनचार पैसे मिळतील. ही धोंड उचलून तुला काही मिळणार नाही." अन् तो शाळेच्या दिशेने निघून गेला.

शेतकऱ्याने येणाऱ्या जाणाऱ्या पादचाऱ्यांना देखील मदतीसाठी विनविले. पण कुणीही त्याच्याकडे लक्ष दिले नाही. काही जणांची मजल तर त्याची टिंगळटवाळी करण्यापर्यंत गेली. काही जणांनी त्याला सूज्ञ सल्ला दिला की सरकार असताना आपण अशा कामात का लक्ष घाला. ज्याचं काम त्यानं करू दे.

शेतकऱ्याच्या विवेक बुद्धीला ते पटेना. ती धोंड भर रस्त्यात तशीच ठेवून पुढे जाणे त्याला पसंत पडले नाही. शेवटी तो एकटाच ती धोंड हलवू लागला. आस्ते आस्ते धोंड सरकत राहिली. शेतकऱ्याला बरीच मेहनत करावी लागत होती. येणारेजाणारे त्याच्याकडे तुच्छतेने पहात नि त्याच्याविषयी वेडीवाकडी प्रतिक्रिया व्यक्त करत आपापल्या मार्गाने गर्दीतून रस्ता काढत पुढे सरकत होते. तरीही शेतकरी आपल्या प्रयत्नाला चिकटूनच होता. धोंड थोडी हलली तेव्हा त्याच्याखाली थैलीसारखे काहीतरी असल्याचे त्याला जाणवले. अखेर त्याच्या प्रयत्नाला यश आले. एकदाची ती धोंड रस्त्याच्या बाजूला नेण्यात शेतकरी यशस्वी झाला. त्याला त्या दगडाखाली पैशाची एक थैली सापडली. त्या थैलीत एक चिठी लिहिलेली होती, 'हा दगड येथून हलविणाऱ्याला ही छोटीसी भेट.' त्या थैलीत बऱ्यापैकी रक्कम होती. शेतकऱ्याचे नशीब खुलले. त्याने फक्त एक दगड बाजूला केला पण त्यामुळे त्याचे भविष्य बदलले. त्याच्या आर्थिक विवंचना कायमच्या दूर झाल्या.

ही वार्ता वाऱ्यासारखी सर्वत्र पसरली. एक धोंड बाजूला सरकवल्यामुळे शेतकऱ्याचा कसा आर्थिक फायदा झाला याचीच चर्चा नगरानगरात नि गावागावात लोकांच्या तोंडी होती. तेव्हापासून प्रत्येकजण आपल्याला काहीतरी बक्षीस मिळेल या आशेने काम करू लागला. लोकांना तर आता जणू एकप्रकारची सवयच लागली होती. जी जी काही छोटीमोठी सार्वजनिक कामे होती त्यासाठी सरकारच्या मदतीची अपेक्षा न करता पण बक्षीसाच्या अपेक्षेन स्वत:हून करू लागली. नंतर नंतर तर बक्षीसाची लालसा रयतेने सोडून दिली व निस्वार्थीपणे जो तो आपली कामे करू लागली. रयतेच्या विचारसरणीत हळूहळू बदल घडत गेला. त्यांना कामात मजा वाटू लागली. राजाची खेळी अचूक ठरली. जे काम आतापर्यंत अनेकवार समजावून जमले नाही तो बदल त्याच्या एका युक्तीने चुटकीसरशी झाला. कामचुकार कामसू झाले. जनतेच्या मनोवृत्तीत झालेला हा बदल पाहून राजाला मनस्वी आनंद झाला. आता तो अधिक आत्मियतेने रयतेच्या अडीअडचणी, सोयीसवलतींकडे लक्ष पुरवू लागला. प्रजाजन संतुष्ट झाली. ती राजाला धन्यवाद देऊ लागली.

मित्रांनो, केलेल्या कामाचा आपल्याला त्वरित मोबदला मिळावा अशी अपेक्षा करू नका. मोबदला हा पैशाच्याच रूपाने मिळावा अशीही अपेक्षा बाळगू नका. तुम्ही जे जे काम करता, त्याचा तुम्हाला जरूर मोबदला मिळेल. खरे तर आपण केलेल्या कामाचा आनंद हाच सर्वात मौल्यवान मोबदला आहे, हेही विसरू नका।



Scanned with CamScanner

विशेष स्वातंत्र्याचा हीरक महोत्सव

# खरे स्वातंत्र्य व सुख, समृद्धी आपणांस लाभली आहे काय?

"...देशातील सर्वसामान्य माणूस, किसान आणि मजूर यांचे दैन्य नाहीसे करण्यासाठी काय केले पाहिजे याचा प्रथम विचार केला पाहिजे. प्रत्येक स्त्री-पुरुषाला न्याय मिळाला पाहिजे. सामाजिक, आर्थिक, राजकीय उन्नती करून हे लोकशाही राष्ट्र समृद्ध केले पाहिजे. अनेक वर्षापूर्वी आपण हा नियतीशी करार केला होता. आज त्याची पूर्ती, सर्वांशाने का नसेना, पण पुष्कळशा अंशाने करत आहोत... आपल्याला स्वतंत्र भारताचा एक उत्तुंग असा प्रासाद उभारायचा आहे. दारिद्र्य निर्मूलन, रोगराई व अज्ञानाचा नायनाट, संधीच्या असमानतेला विराम अशी शिखरे गाठावयाच्या आव्हानाला आपल्याला तोंड द्यावयाचे आहे..." पंडित नेहरूंनी १५ ऑगस्ट १९४७ रोजी लाल किल्ल्यावरून व्यक्त केलेला हा भाबडा आशावाद नव्हता. ते होते एका द्रष्ट्याचे स्वप्न. स्वातंत्र्याच्या संग्रामात लढत असताना अज्ञान, दारिद्र्य, सामाजिक-आर्थिक-धार्मिक व जातीय विषमता नाहीशी करून लोकशाहीवर आधारित आत्मनिर्भर बलशाली स्वतंत्र भारत उभा राहावा, असे प्रत्येक स्वातंत्र्य सैनिकाचे स्वप्न होते. या स्वप्नाच्या पूर्तीसाठी कित्येक वर्षे ते प्राणपणाने झगडत राहिले. लढत राहिले. त्यांच्या असीम त्यागाने आणि अथक परिश्रमाने मिळालेल्या स्वातंत्र्याचे गेल्या साठ वर्षांच्या काळाचे सिंहावलोकन केले असता, क्षणाक्षणाला त्यांच्या स्वप्नांचा चुराडा होत आहे असे वाटते.

स्वातंत्र्य मिळताच आपण दारिद्र्याचे निर्मूलन करण्याचा विडा उचलला. अज्ञानाचा दिवा मालवून ज्ञानदिप घरोघरी तेवत ठेवण्याचा संकल्प केला. देशातून रोगराईचे उच्चाटन करण्याचा निर्धार केला. असमानता संपवून समानता प्रस्थापित करण्याचा चंग बांधला, तरीही आज ५० वर्षानंतर भारतात काय चित्र दिसते ? ऐक्यभावना वाढीला लागावी म्हणून आजही आवाहन करावे लागत आहे. दारिद्र्य, रोजगार, शेतकरी-कामगारांचे प्रश्न आहेत तेथेच आहेत. उलट गटबाजीचे पेव वाढू नये, असे वाटत होते. त्यानेच अधिक जोर धरला आहे. गरीब व श्रीमंत यातील दरी वाढत चालली आहे. अशांतता, सत्तेसाठी व खुर्चीसाठी राजकारण करणाऱ्यांनी स्वत:ची पोतडी भरून घेण्याचा सपाटा चालवलेला आहे, त्यातूनच आर्थिक घोटाळ्यांची प्रकरणे दिवसेंदिवस वाढत चालली आहेत. भ्रष्टाचार, लाचलुचपत आणि गुन्हेगारांनी सारी क्षेत्रे व्यापून टाकली आहेत. हल्ली नेत्याला निष्ठा वाहिली की, सत्तेच्या जवळ पोहोचता येते आणि सत्ता मिळाली की देशाच्या संपत्तीच्या कोठाराच्या चाव्या आपोआप हाती लागतात, हे समीकरण रूढ झाले आहे. लोकशाहीच्या गोंडस नावाखाली ही नेतेमंडळी सरकारच्या तिजोरीवर दिवसाढवळ्या दरोडे घालत आहेत. मनगटशाहीने दुसऱ्याचे यश लुबाडले जात आहे. मग कसे बरे आपण स्वातंत्र्य अनुभवणार ?

सन २००० मध्ये जगातील सर्वाधिक निरक्षर आपल्या देशात असणार आहेत. शिक्षणावर करोडो रुपयांचा चुराडा करूनही देशात ४० कोटी लोक निरक्षर आहेत. वैज्ञानिकदृष्ट्या प्रशिक्षित मनुष्यबळाची वानवा नसताना देशातील पुरुषांपैकी फक्त ६९



Scanned with CamScanner

टक्के साक्षर आहेत तर महिलांचे हे प्रमाण ३९ टक्के आहे. ८० टक्के विद्यार्थी जेमतेम आठवीपर्यंत शिक्षण घेऊ शकतात आणि सुमारे ५० टक्के विद्यार्थी माध्यमिक शालान्त परीक्षेत अनुत्तीर्ण होतात.

भारतातील जवळजवळ निम्मी प्रजा, दारिद्र्यरेषेखाली राहात आहे, सत्याणव - अठ्ठ्याणव कोटी लोकसंख्येच्या या देशात छत्तीस कोटी लोक दारिद्र्यात राहातात, तर ८० टक्के जनतेला महागाईच्या वणव्याची झळ पोहोचत आहे. त्यांच्यासाठी सरकारकडे कोणताही ठोस कार्यक्रम नाही. लोकसंख्येतील प्रत्येक सातवा मनुष्य आसऱ्या अभावी फूटपाथवर पथारी पसरून राहात आहे. अन्नधान्याच्या बाबतीत आपण स्वयंपूर्ण असूननही पाच वर्षाखालील मुलांपैकी ६३ टक्के बालके कुपोषित आहेत. एकीकडे पक्वानांच्या मेजवाण्या झडताना कित्येक हजारो रुपयांचे अन्न उकिरड्यावर फेकून आपल्या संपत्तीचा टेंभा मिरवणारे उच्चभ्रु आहेत, तर दुसरीकडे पोट खपाटीला जाऊन अन्नअन्न करीत भूकबळी जाण्याचे प्रकारही इथे घडत आहेत. मग शेतकऱ्यांनी घाम गाळून पिकविलेले अन्न कुणासाठी ? आदिवासींना अजूनही अर्धपोटीच राहावे लागत आहे. पन्नास वर्षांच्या वाटचालीत सर्वांना अन्न उपलब्ध झालेले नाही, हेच खरे आहे.

पूर्वी रस्त्यांवर साधी सायकलही दिसत नव्हती पण आज टॉयाटो, मर्सिडीस, एस्टीम, आदी किमती गाड्यांची रेलचेल दिसत आहे. पण रस्त्यांची दुर्दशा मात्र कायम. महागड्या गाड्या आल्या पण रस्ते सुधारले नाहीत. खेड्यापाड्यांत रस्त्यांवरची मोठमोठी विवरे म्हणजे जणू मृत्यूचा सापळाच ! त्या रस्त्यावरून धावणाऱ्या गाड्या पाहिल्या म्हणजे प्रवाशांची कीव येते.

आरोग्यसेवेच्या बाबतीतही असेच विदारक चित्र पाहायला मिळते. पाच-पाच हजार रुपये खर्च करून जलशुद्धीकरणाची यंत्रे एकीकडे विकत घेतली जाताहेत तर देशातील १ लाख ७५ हजार खेड्यांमध्ये दीड किलोमीटरच्या परिसरात पिण्याचे पाणी उपलब्ध नाही. गृहिणींना पाण्यासाठी हंडे घेऊन वणवण फिरावे लागत आहे. खेड्यात अजूनही शुद्ध पाणी मिळणे दुरापास्त झाले आहे. कपडे धुण्यासाठी वापरायचे पाणी, जनावरे धुण्यासाठी वापरायचे पाणी, भांडी घासण्यासाठी वापरायचे पाणी व पिण्याचे पाणी यात काही फरक असू शकतो ते खेड्यातील लोकांच्या गावीही नसते. त्यातच मलेरिया, हीवताप, अशा रोगांवर अजूनही साधी लस सर्वत्र उपलब्ध नसताना आमचे अतिमहत्त्वाचे व्यक्ती स्वत:च्या आरोग्यावर तसेच आपल्या नातेवाईकांच्या आरोग्यावर सरकारी तिजोरीतून कित्येक करोड रुपये उधळत आहेत. भारतात पुरेशी आरोग्य सेवा उपलब्ध असतानाही परदेशात जाऊन सरकारी पैशाने उपचार करवून घेणे हे आज प्रतिष्ठेचे लक्षण समजले जात आहे. भलेही मग ह्या देशातील

> गेल्या साठ वर्षांचा अनारोग्य, अज्ञान, भ्रष्टाचार आणि दारिद्र्य यांच्या पार्श्वभूमीवर 'विकासाचा' हा जो आलेख काढला गेला आहे, त्यास आपल्या देशातील राजकारणी सर्वार्थाने कारणीभूत आहेत. कारण देशापुढील या बिकट समस्या आपल्याही आहेत, त्या सोडविणे हे आपले कर्तव्य आहे, असे भारतातील सत्ताधारी वर्गाने कधीच मानले नाही, उलट या सगळ्यांचे भांडवल करून आपले राजकारण साधण्याचे कुटील काम या आपल्या नेतृत्वाने केले. त्या ओघात विकासाची काही उष्टी फळे दुर्बल घटकांच्या झोळीत पडली एवढेच. साठ वर्षांत कष्टाने मिळवलेल्या स्वातंत्र्याची ही क्रूरचेष्टा नव्हे काय?



Scanned with CamScanner

गरीब जनतेच्या आरोग्याचे काहीही होवो.

लोकशाहीच्या मंदिरात - संसदेत घटनेनुसार कामकाज चालू न देणे हे आता नित्याचेच झाले आहे. जे संसदेत तेच राज्यांच्या विधानसभेत. अशांतता, सत्ता व खुर्चीसाठी राजकारण करणाऱ्यांचीच भाऊगर्दी आज वाढत आहे. भ्रष्टाचार हाच शिष्टाचार ठरू पाहात आहे. गरीब व दलित जनतेचे प्यादे राजकारणी पटावर हलवत आहेत. मतासाठी भाबड्या जनतेचा बिनदिक्कत वापर करून घेतला जात आहे. राजकारणातील घराणेशाहीने कळस गाठला आहे. काहीही हावो पण खुर्ची सोडायची नाही. कायदा व घटनेतील उणीवांचा पुरेपूर वापर करून सत्तालोलुप नेते नीच राजकारण खेळत आहेत. गुंडशाही, ठोकशाही, मनगटशाही यांचा मुक्तहस्ते वापर केला जात आहे. पंतप्रधानांवर कोर्टाचे समन्स बजावण्यापर्यंत देशाची अधोगती झाली आहे. मुख्यमंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे खटले चालविले जात आहेत. एखाद करोड रुपयांचा भ्रष्टाचार हा अत्यंत मामुली स्वरुपाचा समजून जास्तीत जास्त करोड रुपयांचा भ्रष्टाचार करण्यात त्यांच्यात चुरस लागलेली आहे. स्वत:ची पोतडी भरण्यासाठी सत्तेचा वापर केला जात आहे. आज गल्लीपासून दिल्लीपर्यंत हेच चित्र दिसत आहे.

गेल्या साठ वर्षांचा अनारोग्य, अज्ञान, भ्रष्टाचार आणि दारिद्र्य यांच्या पार्श्वभूमीवर 'विकासाचा' हा जो आलेख काढला गेला आहे, त्यास आपल्या देशातील राजकारणी सर्वार्थाने कारणीभूत आहेत. कारण देशापुढील या बिकट समस्या आपल्याही आहेत, त्या सोडविणे हे आपले कर्तव्य आहे, असे भारतातील सत्ताधारी वर्गाने कधीच मानले नाही, उलट या सगळ्यांचे भांडवल करून आपले राजकारण साधण्याचे कुटील काम या आपल्या नेतृत्वाने केले. त्या ओघात विकासाची काही उष्टी फळे दुर्बल घटकांच्या झोळीत पडली एवढेच. साठ वर्षांत कष्टाने मिळवलेल्या स्वातंत्र्याची ही क्रूरचेष्टा नव्हे काय ?

उतरणीवरून वेगाने घसरणाऱ्या राष्ट्रगाड्याला थोपविण्याच्या निर्धाराने भारलेले नेतृत्व कोठेही दृष्टीपथात येत नाही, ही चिंतेची बाब आहे. देशाचा राजकीय प्रवास स्थैर्याकडून अस्थैर्याकडे, अखंडतेकडून फुटिरतेकडे आणि कायद्याच्या राज्याकडून झुंडशाहीकडे सुरू झाला आहे. हे चित्र असेच रंगणार असेल तर स्वातंत्र्याच्या हिरक महोत्सवापर्यंत आपण अधोगतीची परिसीमा गाठलेली असू.

गैरमार्गाला लागलेल्या राज्यशक्तीवर लोकशक्तीचा अंकुश असल्याखेरीज ती पुन्हा सरळ मार्गावर येणार नाही. पण सत्ताधाऱ्यांना जिचे भय वाटावे, अशी लोकशक्ती कुठेच संघटित होताना दिसत नाही. आज पन्नास वर्षांनंतरही प्रत्येक जण 'देशाने माझ्यासाठी काय केले ?' असा सवाल विचारतो आणि 'काहिही केले नाही' असे सांगून मोकळा होतो. पण तोच 'मी देशासाठी काय केले ?' असा स्वत:ला सवाल विचारण्याचे हेतुपुरस्सर टाळतो कारण आपण आजतागायत देशासाठी काहीच केले नाही हे प्रत्येकाला पक्के ठाऊक आहे. आजच्या तरुणाला स्वातंत्र्य आयते मिळाले नाही. पूर्वीच्या लोकांनी देशासाठी रक्त वाहिले पण आजचा 'फॅशनेबल' तरुण आपला साधा घामही देशासाठी गाळू इच्छित नाही, ह्यातच सारे काही स्पष्ट होते. आजच्या या भयावह परिस्थितीला प्रत्येक भारतीय नागरिक व्यक्तीश: व सामूहिकरित्या जबाबदार आहे. आपण जगातील सर्वांत मोठ्या लोकशाहीचा टेंभा मिरवितो पण खरीखुरी लोकशाही जगत नाही. राष्ट्रभावनेने प्रेरित होऊन कंबर कसल्याशिवाय आता तरणोपाय नाही, हेच खरे. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी मागच्या पिढीने परकियांशी लढा दिला. आता स्वातंत्र्य टिकविण्यासाठी आपल्याला स्वकीयांशी लढाई सुरू करावी लागणार आहे.

- शरद विचारे.



Scanned with CamScanner

विशेष

# स्तनपानाचे महत्त्व

**ऑगस्टचा पहिला आठवडा हा 'जागतिक स्तनपान सप्ताह' म्हणून साजरा केला जातो. आई-बाळाच्या त्या पहिल्या स्पर्शाबद्दल आणि स्तनपानाच्या महत्वाबद्दल....**

'मातृत्व' हा स्त्रीच्या जीवनातील एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा समजला जातो. मातृत्वप्राप्तीनंतरच स्त्रीचे जीवन सफल होते, असा समज आपल्या देशात अनेक वर्षांपासून चालत आलेला आहे. थोड्याफार फरकाने आजवर तो अस्तित्वात आहे. संसारवेल बहरणे हा निसर्गचक्राचाच एक भाग आहे. नवमाता आपल्या नवजात बालकाच्या विश्वात रमून जाते. तिला आपले जीवन सार्थकी लागल्याचे समाधान मिळते. बाळाच्या जन्मानंतर स्त्रीच्या जबाबदारीत बऱ्याच प्रमाणात वाढ होते. नवजात बाळाचे संगोपन करण्यापासून त्याला चांगले संस्कार घडवून आदर्श अपत्य बनविण्याप्रर्यंतचा हा दीर्घ प्रवास असतो. कारण अपत्याला जन्म देऊन मातेचे कर्तव्य संपत नाही, तर तेथूनच ते सुरू होते.



एखाद्या मातेला बालसंगोपनाचा विषय कथन करून सांगणे हा एखाद्या सामान्य पुरुषाचा प्रांत नाही. तथापि, बदलत्या जीवनशैलीमुळे बालसंगोपनातदेखील बदल होत आहे. आपल्या अशा काही प्रथा नव्या युगात कालबाह्य ठरत आहेत. अशा कालबाह्य ठरणाऱ्या प्रथांत काही वाईट प्रथांचे उच्चाटन होत आहे तसेच काही चांगल्या प्रथादेखील नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. असाच एक अत्यंत महत्वाचा बदल घडत आहे. बालसंगोपनाच्याबाबतीत. तो म्हणजे बाळाला स्तनपान देण्यात दिसून येणारा उदासीनपणा. खरे पाहता ही उदासीनता भारतातच आहे अशातला भाग नाही. ही एक जागतिक समस्या बनली आहे. जन्मानंतर सुरुवातीचे सहा महिने निव्वळ स्तनपान देणाऱ्या मातांचे प्रमाण १९.४ टक्के इतके नगण्य आहे. यावरून ही उदासीनता दिसून येते. आईचे दूध हे अवनीतलावरील अमृत समजले जाते. परंतु अनेक बालकांना हे सहजसुलभ उपलब्ध असलेले अमृत मिळत नाही, असे खेदाने म्हणावे लागते. वस्तुत: अपत्याला आपल्या आईने अंगावर दूध देणे हे नैसर्गिक आहे. प्राणीदेखील याला अपवाद नाहीत. परंतु हल्लीच्या धकाधकीच्या व व मॉडर्न जीवनशैलीत एका अतिशय महत्त्वाच्या बाबीकडे दुर्लक्ष होते आहे, एवढे मात्र खरे.

आईच्या दूधाचे महत्त्व न जमल्यामुळे व जुन्या वळणाचा जणू त्याग करण्याची प्रतिज्ञा केल्यामुळे बाळाला अंगावर पाजणे हे मागासलेपणाचे लक्षण समजले जाऊ लागले आहे. त्यातच भरीस भर म्हणजे आपली वस्तू खपावी म्हणून केलेली कलात्मक जाहिरातबाजी. टी.व्ही.सारख्या छोट्या पडद्यावरदेखील गुटगुटीत बाळांचे दर्शन घडवून



Scanned with CamScanner

आपण भावी पिढीला सुदृढ बनविण्यासाठी कसे पौष्टीक बालान्न पुरवितो याचे वारेमाप प्रदर्शन घडविले जाते. सामान्यत: पालकांची मानसिकता अशी असते की आपल्या नवजात बाळाने गुटगुटीत व्हावे व सदैव निरोगी असावे म्हणून आपल्या ज्ञानाच्या बाहेर जाऊन इतरांच्या सांगण्यावरून वा जाहिरातबाजीवरून वारेमाप पैसा खर्च केला जातो. बाळाला साधा सर्दी-खोकला झाला तरी पालक कामावरून रजा घेऊन घाबऱ्याघुबऱ्या मनस्थितीत बालरोगतज्ज्ञाच्यां दवाखान्यात रांगा लावून बसतात. अर्थात, आजारा हा नेहमी आजारच असतो. त्याची अनेक कारणेदेखील असू शकतात. परंतु आजारात देखील त्याच्या तीव्रतेनुसार फरक हा असतोच की. बऱ्याचदा तीन-चार महिन्याचे बालक वारंवार शी करते म्हणून बालरोगतज्ज्ञांकडे जाणारी पालक मंडळी देखील पाहण्यात येतात. लहान मुलाने दिवसातून सहा-सात वेळा संडास करणे ही नैसर्गिक बाब समजली जाते. असो. वैद्यक क्षेत्रात आपण न शिरता स्तनपानाच्या महत्त्वाकडे वळू या.

मातेचे दूध हे बाळासाठी पूर्णान्न समजले जाते. वस्तूत: प्रसूती जर साधारण झाली असेल तर जन्म झाल्यावर अर्ध्या तासाच्या आत आणि सीझेरियन झाले असेल तर चार तासांच्या आत बाळाला अंगावर पाजायला घ्यावे, असे डॉक्टरांचे म्हणणे आहे. बाळाच्या सर्वांगीण वाढीसाठी व विकासासाठी लागणाऱ्या सर्व गरजा भागवते. त्यात प्रथिने, कार्बोदके, जीवनसत्वे ही यथायोग्य प्रमाणात असतात. बाळाच्या गरजेप्रमाणे या दूधातील घटकांचे प्रमाण बदलत असते. अगदी आठवड्यालाही आईच्या दूधातील अन्नघटकांचे प्रमाण कमी-अधिक होत असते. बाळाची रोगप्रतिकारशक्ती वाढविणारी द्रव्येही मातेच्या दूधात बऱ्याच प्रमाणात असतात. शिवाय ते निसर्गत: निर्जंतूक असते. बाळंतपणानंतर पहिल्या दोन-तीन दिवसांत स्रवणारे चिकदूध हा निसर्गाचा चमत्कारच समजला पाहिजे. कारण यात अफाट शक्ती असते. अनेक प्रकारच्या जीवनसत्वांची रेलचेल असते. रोगप्रतिकारशक्तीचा खजिना असतो. जणू ही बाळाची 'पहिली लस' असते. तथापि, गैरसमजुतीमुळे काही बाळांना हे अत्यंत महत्त्वाचे दूध वेळीच मिळत नाही. ते फेकून दिले जाते. शिवाय, स्तनपानाच्या सवयीमुळे बाळाला आईची ऊब मिळते. माता व अपत्य यांतील भावनिक बंध अधिकाधिक दृढ होतात. संशोधनाने सिद्ध झाले आहे की ज्या बालकांना आईचे पुरेसे दूध मिळते ती बालके ते न मिळालेल्या बालकांपेक्षा दहा टक्क्यांनी अधिक हुशार व विकसित असतात. अनेक प्रकारच्या रोगांचा प्रतिकार करण्याची त्यांची शक्ती अधिक प्रमाणात असते.

हे असे असतानादेखील आजकाल बाटलीतून बाजारू दूध व दूधान्न देण्याची शॉर्टकट प्रथा शहरांतून दिसून येते. गाईचे दूध हे वासरासाठी असते; म्हशीचे दूध हे तिच्या पाडसासाठी योग्य असते. वरचे दूध पचायला जड असते. ते बाळाच्या शरीरात जंतूंचा शिरकाव करायला मदत करते. शिवाय वरचे दूध पिणाऱ्या बाळाच्या आतड्यातून सूक्ष्म प्रमाणात रक्तस्राव होत राहतो. त्याचेदेखील दुष्परिणाम बाळाला भोगावे लागतात. म्हणून आईचे दूध हे बाळासाठी अत्यंत उपयुक्त असते. ते पचायला हलके असते तसेच संपूर्ण सुरक्षित असते. परंतु बाळाला अंगावर पाजणे हे मागासलेपणाचे समजण्याकडे मातांचा कल वाढत आहे. आपल्या सुडौल बांध्याला स्तनपानाने बाधा येईल म्हणून स्तनपान नाकारणाऱ्यादेखील काही महिला आहेत. शहरांतील बऱ्याच माता नोकरीनिमित्त घराबाहेर असतात. त्यांना पूर्णवेळ बाळाजवळ राहता येत नाही. त्यामुळे त्यांना दोन-अडीच



Scanned with CamScanner

महिन्यांतच अंगावरचे दूध तोडावे लागते. आणि बाळाच्या तोंडी प्लॅस्टीकची दूधाची बाटली लावली जाते. या दूधाच्या बाटलीची योग्य ती निगा आणि स्वच्छता जर राखता आली नाही तर बाळावर त्याचे विपरीत परिणाम दिसून येतात. आपण बाळाला अंगावरील दूध पुरेशा प्रमाणात देऊ शकत नाही म्हणून त्या माता विविध जाहिरातींना भुलून डब्यांतील महागडे बालान्न खरेदी करतात. परंतु जी पोषकद्रव्ये अंगावरील स्वस्त दूधात आहेत त्यांच्या निम्मेदेखील पोषक घटक या महागड्या डब्यांत नसतात. खरे पाहता आपल्या देशातील बालमृत्यू हे कुपोषणामुळे होत असतात. बाळाला जर आईचे पुरेसे दूध मिळाले तर कुपोषणामुळे होणाऱ्या आजारांचा संभव बऱ्याच प्रमाणात कमी होतो.

ज्या माता बाळाला स्तनपान न देता डब्यातील दूध बाटलीतून पाजतात त्या महिन्याकाठी दीड ते दोन हजार रुपये खर्च करीत असतात. सहा महिन्याला बाळाला साधारत: २२ किलो पावडरचे दूध लागते. पावडरच्या दूधाची किंमत एका किलोस २४० रुपये आहे. म्हणजेच सहा महिन्यांचा दूध पावडरीचा खर्च सुमारे ५,२८० रुपये होतो. शिवाय ते दूध तापवण्यासाठी लागणारे इंधन, बाटली व बोथीचा खर्च वेगळा. या दूधामुळे उद्भवणाऱ्या आजाराचा खर्च सरासरी ५०० रुपये गृहित धरला तर हा आकडा महिन्याकाठी दोन हजारांपर्यंत सहज पोहोचतो. परंतु हेच दूध जर माता आपल्या अंगावर पाजत असेल तर हा साऱ्याचा सारा खर्च वाचवता येतो. कारण हे दूध निर्माण करण्याचा खर्च काहीच नाही. ते नैसर्गिकरीत्या निर्माण होते. भारतात एका वर्षाखालील बालकांची संख्या साधारणत: दोन कोटी अडीच लाख आहे. यांच्या मातांकडून वर्षाकाठी ४४७ कोटी लिटर दूध निर्माण होत असते. जर भारतातील प्रत्येक मातेने बाळाला किमान सहा महिने अंगावर दूध पाजले तर सुमारे ७ हजार कोटींची बचत होऊ शकते.

स्तनपानाविषयी मातांना वाटणारी उदासिनता ही आता जागतिक समस्या बनली आहे. बाल-आरोग्याच्या दृष्टीने स्तनपानाचे महत्त्वाची दखल घेऊन वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन (WHO) आणि युनिसेफ (UNICEF) या जागतिक आरोग्य संघटनांनी १९८९ पासून यशस्वी हालचाल सुरू केली. त्यांनी यशस्वी स्तनपानासाठी एक मार्गदर्शक पुस्तिका तयार केली आहे. जगभर तिचा प्रसार आणि प्रचार करण्यात येत आहे. या पुस्तिकेत स्तनपानाचे महत्त्व विशद करण्यात आले आहे. आपल्या भारतातदेखील या अनुषंगाने विविध पातळ्यांवर स्तनपानास उत्तेजन देण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. केंद्र सरकार, भारतीय बालरोगतज्ज्ञ संघटना, इंडियन मेडिकल असोसिएशन, भारतीय प्रसूतीतज्ज्ञांची संघटना, असोसिएशन फॉर कन्झ्युमर ॲक्शन ऑन सेफ्टी अँड हेल्थ अशा नामवंत संघटना आता एकत्रित प्रयत्न करीत आहेत. आपल्याकडे 'ब्रेस्टफीडींग प्रमोशन नेटवर्क ऑफ इंडिया' (BPNI) ही संघटना गेली अनेक वर्षे स्तनपानाच्या महत्त्वाचा प्रसार करीत आहेत. 'मदर सपोर्ट ग्रूप'सारख्या सेवाभावी संस्थादेखील नवमातांना बालसंगोपनाचे धडे देत असतात. अनेक रुग्णालयांतून स्तनपानाचे महत्त्व विशद करून देणारे चर्चासत्र, प्रबोधन आदी उपक्रम हाती घेतले जातात. असे प्रयत्न सातत्याने होत असले तरी जोपर्यंत माता स्वत:हून स्तनपानाचा अवलंब करीत नाहीत तोपर्यंत खऱ्या अर्थाने बालकांचा स्तनपानावरील अधिकार अबाधित राहणार नाही.

- रेखा देसाई



Scanned with CamScanner

कथा

# गरीब बिच्चारे नवरे !

पावसाबद्दल मला नेहमीच सहानुभूती वाटते. कारण तो आम्हा पुरुषांसारखा, अजिबात पाऊस नाही. म्हणून शिव्याच आणि जास्त धो धो कोसळला तरी त्याच्या नावाने बोंबच. आम्हा पुरुषांचा तरी वेगळा काय अनुभव. बायको नावाचा प्राणी आम्हावर नेहमीच नाखूष! एखादे काम चोख केले तरी ते असे नाही, तसे करायला हवे होते असे खूसपट काढले नाही तर ती बायको कसली. काम नाही केले म्हणून बोलणी ऐकायला लागले नाही असा नवरा सापडणे कठीण.

आज रविवार आहे. चांगली ८-९वाजेपर्यंत ताणून देऊ या, असं आपलं मनोमन ठरलं असतं. तर हिची आपली सकाळी-सकाळी आदेशवजा विनंती. "अहो, हे पहा आज अमुक काम करायचं, नंतर तमुक काम आहे." असे म्हणताच भल्या पहाटे (सकाळी सहा वाजता!) जांभया देत जड झालेल्या पापण्या 'कंपलसरी' उघडाव्या लागतात असे म्हणतात की एका थोर विचारवंतानी असा निष्कर्ष काढला होता की, Man proposes and woman desposes म्हणजे 'पुरुष ठरवितो आणि बायको त्यात मोडता घालते' काय चुकले होते त्याचे? पण बायको डोळे आणि त्याने चक्क Man proposes and God desposes असा बदल केला. देव थोडच डोळे वटारणार?

सेवानिवृत्त झालेले पुरुष म्हणजे बिनकामाचा मंत्री. असून अडगळ आणि नसूनही फरक. याउलट सेवानिवृत्त आई, आजी म्हणजे भाव वधारतो.

आपल्या डोक्यात लहानपणापासून गच्च भरलेले असते की, बायका म्हणजे अबला. बिच्चाऱ्या! त्यांना कसले आलंय स्वातंत्र्य. पण विचार करा, एखाद्या मुलाने, मुलींचे कपडे घातलेले कधी पाहिलेले आहे? याउलट मुली / बायका पुरुषांचे शर्ट, पॅन्टी बिनधास्त घालतात. हेअरस्टाईलचे तर असंख्य प्रकार. अगदी लांबशेपट्यापासून, बॉबकट आणि पुरुषांसारखे तोकडे केस काय! कुणाचे काही म्हणणे नाही, टीका नाही, विरोध नाही. याउलट एखाद्या मुलाने मायकल जॅक्सनसारखे केस वाढवले की येणारे जाणारे टक्के टोमणे मारल्याशिवाय पुढे जाणारच नाहीत.

आजकाल कोणत्याही बाईला तोच नवरा सातजन्मी नको असतो. त्यामुळे वटपोर्णिमेचा उत्साह कमी झालाय असे म्हणतात. खरं खोटं बायकाच जाणे. सगळी व्रतवैकल्ये बायकांच्या माथी मारलेली, त्यामुळे त्यांना वाटते पुरुषांचा जन्म बरा. पण बायांनो, घाई करून पुढला जन्म पुरुषांचा मागू नका. आजकाल 'हाऊस हसबंड'चे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे बायकांची कामे पुरुष करायला लागलेत. त्यासाठी पुढील जन्म पुरुषांचा मागताना विचार करा नाहीतर पश्चाताप करायची पाळी यायची.

व्रतवैकल्यांना फाटा देणारा महिलावर्ग हळदीकुंकू समारंभ मात्र न विसरता साजरा करतात. याची पुरुष वर्गानी गंभीर दखल घ्यायला हवी!

(पृष्ठ क्रमांक १३ वर)



Scanned with CamScanner

# पिंजारी

पूर्वी मुंबईतल्या सर्वसामान्यांच्या विरळ वसाहतींमधून टराँव, टराँव, असा आवाज करीत 'पिंजारी' फिरायचे. त्यावेळी लहान मुलं त्यांना घाबरून पळत असत. लोक त्यांच्याकडून सणासुदीच्या निमित्ताने बिछाने, गाद्या, उशा वगैरे बनवून घेत. कालानुरूप हे पिंजारी आज खूप कमी झालेत मुंबईत. तरीही त्यातूनही आज मुंबईतील वरळी, नागपाडा, चिंचपोकळी, परळ,जोगेश्वरी भागात राहणारे हे श्रमिक जेमतेम गुजारा करून आहेत.

'पिंघण' या आपल्या पारंपारिक हातयंत्राचा टराँवऽऽऽ, टराँवऽऽऽ, असा आवाज तारेवर छेडीत ही माणसं गल्लीबोळ, रस्त्यावर फिरून लोकांचे लक्ष वेधून घेतात. या पिंधणाचा मुख्य सांगाडा सागवान लाकडाचा बनलेला असतो. त्याला एका बाजूने बांघलेली असते, बकरीच्या आतड्याची चिवट दोरी. 'टराँव' असा आवाज या दोरीच्या टणत्काराचा. सांगाड्यातून बांधलेली शिसवी लाकडाची डंबेल्ससारखी 'मुठीया' या साऱ्या आयुधांबरोबर गादीतील समान पातळीवर आपटून आणण्यासाठी लागणारी बांबूची काठी आणि बिछाना शिवण्यासाठी लांब दाभण आणि दोरा. ही सामग्री घेऊन, हा कसबी मंडळी वेगवेगळ्या प्रकारच्या गाद्या, बिछाने, उशा, गिरद्या तयार करून देतात. कासेत बऱ्याचदा पंचवीस-तीस किलो कापूसही बाळगतात ते. ऑडरप्रमाणे साधा, हातबॉक्स, आणि पायपिंग बॉक्स असे आकर्षक बिछाने बनविण्यात त्यांचा हातखंडा असतो. पण आजच्या तारखेला त्यांच्या या धंद्यावर व्हॉयर, फोम अशा रेडीमेड आधुनिक मॅट्रेस कंपन्यांनी गदा आणलीय.

वरळीच्या प्रेमनगरात जेमतेम दहा बाय दहाच्या कोंदट खोलीत बाबूभाई उर्फ मोहम्मद आरिफ हा साठीतला पिंजारी आपल्यासोबत आणखी साताठ जणांना बरोबर घेऊन राहतो आहे. सर्वांचा उद्योग तोच, गाद्या बनवणं, शौकतअली, मखनजी, उमेदभाई, शर्पूजी, अश्रफ ही सारी मंडळी बाबूभाईसोबत राहतात. हे सारे 'राजस्थानी मुसलमान' हा धंदा आपलीच मक्तेदारी मानणारे. बाबूभाई गेली चाळीस वर्षे या धंद्याला चिटकून आहेत. पावसाळ्यात त्यांचा धंदाही थंड असतो. इतका की, कमाईदेखील शून्य डिग्रीवर जाते. त्या दिवशी मग थंड पाणी पिऊन, अल्लातालाच्या भरोशावर ही मंडळी उद्याच्या आशेच्या किरणांची वाट पाहत झोपून जातात. दिवसा मुंबईभर भटकताना नमाज वगैरे अदा करायला कसं जमतं असं विचारलं तेव्हा... 'हमारा मजहब सिरफ नाम के लिए है साब, जब घूमते रहते है रोटी के लिए तब हमारा मजहबही भूल जाते है... लगातार मेहनतही हमारा मजहब है,' ते म्हणतात.

बाबूभाई आणि त्यांचे सहकारी एवढं करूनही महिन्याकाठी पाचेकशे रुपये साठवून, ते आपल्या मुलुखात पाठवतात. बाबूभाईची बायका-पोरं, सुना-नातवंडं गावात त्याचाच पिंजऱ्याचा म्हणजेच त्यांच्या गावच्या भाषेत बुनाईचा धंदा करतात.

संपूर्ण मुंबईत आज साधारणपणे दोनशे पिंजारी शिल्लक आहेत. पूर्वी म्हणजे वीसेक वर्षांपूर्वी हा आकडा हजार-बाराशेवर होता, असं बाबूभाई म्हणतो. अलीकडे उत्तर भारतीयांनी आमच्या धंद्यावर अतिक्रमण केलंय, असं बाबूभाईप्रमाणेच शौकतअली आणि मखनजीचंही म्हणणं आहे.



Scanned with CamScanner

याउलट अजूनही काही चिकित्सक आणि चोखंदळ गिऱ्हाईकांकडे लग्नाच्या निमित्ताने लागणारे बिछाने बनवायला या, 'राजस्थानी पिंजाऱ्यांना' खास बोलावून नेतात. एवढंच नव्हे, तर चित्रपटांचा सेट उभा करण्यामध्येही त्यांची कला कामास आली आहे. आज मुंबईतल्या गिरण्यांची घरघरही थांबलीय, त्यामुळे स्वस्त आणि मस्त कापूसही मिळत नाही. ४० ते ५०रुपये किलोचा महाग कापूस घेऊन, आणखी त्यावर मजुरी मोजण्यापेक्षा रेडीमेड गाद्याच लोक पसंत करतात. त्यामुळे रेडिमेडवाल्यांचं फावलंय. तरुण कारागीर त्यामुळे आताशा कंटाळलेत. आता ते दुकान थाटून तयार गाद्या बनवायच्या उद्योगावर विचार करताहेत. त्यामुळे सतारीसारखी दिसणारी 'पिंधण' इथून पुढे खुटींवर अशीच अबोल राहणार आणि तिचयाबरोबर पिंजारीदेखील संपणार, अशी चिन्हे दिसू लागली आहेत.

**- संदीप राऊत**

**कायम लक्षात ठेवा...**

**न्याय करा ..... हक्काच्या बाजूने**

**लपवून ठेवा .... इतरांतील दोष**

**नतमस्तक व्हा .... फक्त परमेश्वरापुढे**

**देऊन टाका .... कर्ज त्वरेने**

**रडा .... ईश्वराच्या भीतीपोटी**

**दया करा .... गरिबांवर**

**चौकशी करा.... आजाऱ्यांची**

**निर्भर्त्सना करा ..... दुष्कर्मांची**

**आठवण ठेवा ..... मरणाची**

(पृष्ठ क्रमांक ११ वरून)

नाहीतर महिलावर्गाची एकजूट होणार आणि आपण मात्र असंघटित कामगाराप्रमाणे - असंघटित पुरुष बायकोशाहीने पिळून निघणार ! अजून वेळ गेली नाही. 'साऱ्या जगातील नवऱ्यांनो एक व्हा! अशी हाक देऊन साऱ्या पुरुषवर्गाची एकजूट करायला हवी.

तुम्हाला सांगतो, फुले, आंबेडकर इ. थोर नेत्यांनी स्त्रीशिक्षणासाठी पुढकार घेतला आणि चळवळी कल्या त्यामुळे स्त्रियांची परिस्थिती सुधारली याबाबत दुमत नाही. मी तर म्हणतापे स्त्री म्हणजे संसार रथाचे हे दुसरे चाक अंमळ जास्तच पुढे यायला लागलंय असं वाटतंय. मला तर बुवा पुरुषवर्गाबद्दल चिंता वाटायला लागलीय ! बिच्चारा पुरुष या शर्यतीत मागे तर नाही पडणार? मला तर वाटते पुरुषांची स्थिती सुधारण्यासाठी चळवळ सुरू करावी. (काय सांगावे ५० वर्षांनी पुरुषांची स्थिती सुधारणारे आपण फुले, आंबेडकर ठरू !)

आज कोणतेही क्षेत्र घ्या बाया आघाडीवर. ते जाऊ द्या टी.व्ही. किंवा वर्तमानपत्रातील जाहिराती बघा. त्यांच्याशिवाय कुणाचे पान हलत नाहा. साधी दाढीची शेव्हींग क्रीम घ्या. बायकांचा तेथे काय संबंध. पण ह्या जाहिरातीसाठी सुंदर सुंदर ललनाच हव्यात.

असा सर्व घोटाळा आहे. म्हणून म्हणतो, साऱ्या जगातील पुरुषांनो एक व्हा. रात्र (अन् दिवसही) बायकांची आहे ! सावध रहा !

**- दिलीप मोरेश्वर चौधरी**, वसई



Scanned with CamScanner

contact (022) 28504088

# BENEDICT

## PRINTERS

SPECIALIST IN :
OFFSET, SCREEN, LETTER PRESS
ALL TYPES OF BOOK BINDING AND D.T.P.

D'SOUZA SADAN, NO. 1, NEAR ANAND BABA ASHRAM, BEHIND
VANITA HOTEL, LAXMI NARAYANA MANDIR ROAD,
SAKINAKA, MUMBAI - 400 072

'विचार प्रसार'च्या अंकास हार्दिक शुभेच्छा !

# शिवनेर

## इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी

MS-CIT कोर्स
C-DAC चे विविध कोर्सेससाठी प्रवेश सुरू आहे त्वरा करा!
ही सुवर्णसंधी दवडू नका

**संपर्क**

८/१ए शिवनेर सदन, परेरा वाडी, साकीनाका,
मुंबई - ४०० ०७२ दूरध्वनी क्र. २८५१३३४५



Scanned with CamScanner

## गणपती आणि भगवद्गीतेने प्रेरणा दिली....

सुनिता विल्यम्स

आनंद,उत्साह,यश अशा सगळ्या सकारात्मक भावना ज्यात एकवटल्या आहेत ते प्रतीक आहे श्रीगणेशाचे. गणपतीच्या निव्वळ मूर्तीला पाहूनच मनातील खंत, भिती, नैराश्य ,राग क्षणात नाहीसा होतो. भगवद्गीतेमध्येही कोणत्याही संकटावर मात करता येईल, असे वैश्विक तत्वज्ञान आहे . ही दोन्ही प्रतीके केवळ हिंदूसाठीच नव्हे तर पृथ्वीतलावरील सगळ्यासाठी प्रेरक आहेत.म्हणूनच पृथ्वीबाहेर जाताना मी या विघ्नहर्त्याची छोटीशी मूर्ती आणि भगवद्गीतेची प्रत सोबत घेऊन गेले होते अंतराळात सहा महिन्याची यशस्वी सफर करून आलेल्या भारतीय वंशाची सुनिता विल्यम्सने शुक्रवारी व्हिडीओ कॉन्फरन्सिगद्वारे भारतीयाशी गप्पा मारल्या. ..........

महाराष्ट्र टाइम्स - २१ जुलै २००७

### थोडे हसु या ......

डॉक्टर,माझा उजवा गुडघा ना हल्ली फार दुखतो....

या ,बघू या...

मी नेहमी मॉर्निग वॉकला जातो,हलका आहार घेतो..

आजोबा ,तुमचे वय काय

पंच्याएंशी

म्हणजे तुमच्या गुडघ्याचे वयही पंच्याऐंशीच आहे ना.

मग या वयात तो थोडा दुखणारच.

पण डॉक्टर माझ्या या दुसऱ्या गुडघ्याच वयही पंच्याएंशी आहे,तो नाही दुखत

नवरा-बायकोत पैशाच्या महत्त्वावरून वाद चालू होतो.

नवरा म्हणाला ,सर्व काही पैशामूळेच टिकून आहे अगदी हे घरसूद्धा.

फक्त घरच नव्हे तर मीसुद्धा झटक्यात बायको म्हणाली.

### सुविचार

परधन आणि परस्त्री (स्त्रियांसाठी परपुरूष) कधीच कुणाला सुख देत नाही.

---

जो झोपला त्याचे नशीब झोपले
जो बसला त्याचे नशीब बसले
जो उठला त्याचे नशीब उठले
आणि
जो चालला त्याचेच नशीब चालले.

—संस्कृत श्लोक

With Best Compliments From

*Ignatius Fernandes*

*Umesh*

# FERN'S GARAGE

## AUTOMOBILE SERVICE CENTER

Specialist in
MECHANICAL, TIN JOB, PAINTING,
ELECTRICAL JOB OF
INDIAN & IMPORTED,
PETROL & DIESEL VEHICLES

Opp. Tata Infotech, B Cross Road, J. B. Nagar,
MIDC Andheri (E), Mumbai - 400 059
Mobile - 9892891107



हे मासिक मालक श्री. श्री. शंकर मुकुंद पोखरकर यांच्यासाठी प्रकाशक श्री. राजेंद्र ग. डोंगरे यांनी स्मिता एंटरप्रायझेस, शिवनेर सदन, मोहीली व्हिलेजए साकीनाका, मुंबई - ७२ येथे छापून ७/१, डोंगरे सदन, परेरा वाडी, साकीनाका, मुंबई - ४०० ०७२ येथे प्रसिद्ध केले. (या मासिकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. संपादक नारायण डोंगरे - संपर्क : ९८ ९२ ७९१०६९.
MAH/MAR/26477/131/2004-TC